RNI No. MAHBIL/2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ३४] मंगळवार, सप्टेंबर १४, २०२१/भाद्र २३, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## नगर विकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ सप्टेंबर २०२१.

## उद्‌घोषणा

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयुएन. २०२१/प्र.क्र.२८९/नवि-१८.—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासन याद्वारे सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अनगर-कोंबडवाडी, ग्रामपंचायत खंडोबाचीवाडी, ग्रामपंचायत नालबंदवाडी व ग्रामपंचायत कुरणवाडी (अनगर) या ४ ग्रामपंचायतींचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्याच्या आणि उक्त स्थानिक क्षेत्रासाठी एकत्रित "अनगर नगरपंचायत" या नावाने नगरपंचायत घटीत करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) मधील प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना काढण्याचा आपला हेतू घोषित करीत असून, तिचा मसूदा यासोबत जोडला आहे.

२. उक्त उद्‌घोषणेला आक्षेप घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, ही उद्‌घोषणा **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे त्याची लेखी कारणे सादर करणे आवश्यक असेल.

३. उक्त कालावधीमध्ये मिळालेल्या अशा कोणत्याही आक्षेपावर शासनाकडून विचार करण्यात येईल.

### अधिसूचनेचा मसूदा

क्रमांक एमयुएन. २०२१/प्र.क्र.२८९/नवि-१८.—ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्‌घोषणा, नगर

विकास विभाग, एमयुएन. २०२१/प्र.क्र.२८९/नवि-१८, दिनांक १४ सप्टेंबर २०२१ याद्वारे **महाराष्ट्र शासन राजपत्र** दिनांक १४ सप्टेंबर २०२१ यामध्ये उद्घोषणा प्रसिध्द केली असून, महाराष्ट्र शासनाने सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अनगर-कोंबडवाडी, ग्रामपंचायत खंडोबाचीवाडी, ग्रामपंचायत नालबंदवाडी व ग्रामपंचायत कुरणवाडी (अनगर) या ४ ग्रामपंचायतींचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी व उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी "अनगर नगरपंचायत" या नावाने नगरपंचायत घटीत करण्यासाठी, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) या अन्वये अधिसूचना काढण्याच्या आपल्या प्रस्तावावर आक्षेप मागविले होते;

आणि ज्याअर्थी, अधिसूचनेत नमूद कालावधीत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे प्राप्त झालेल्या आक्षेपांचा शासनाने विचार केला आहे;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुछेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख) आणि (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, "अनगर नगरपंचायत" या नावाने एक नगरपंचायत घटीत करण्यात येत आहे. उक्त संक्रमणात्मक क्षेत्राच्या हद्दी यासोबत जोडलेल्या अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## अनुसूची "अ"

### संक्रमणात्मक क्षेत्राच्या अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेले स्थानिक क्षेत्र

(१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा क्र.तीन) अन्वये स्थापन केलेल्या अनगर-कोंबडवाडी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेले (गावठाणसह) संपूर्ण क्षेत्र.

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा क्र.तीन) अन्वये स्थापन केलेल्या खंडोबाचीवाडी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेले (गावठाणसह) संपूर्ण क्षेत्र.

(३) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा क्र.तीन) अन्वये स्थापन केलेल्या नालबंदवाडी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेले (गावठाणसह) संपूर्ण क्षेत्र.

(४) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा क्र.तीन) अन्वये स्थापन केलेल्या कुरणवाडी (अनगर) या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेले (गावठाणसह) संपूर्ण क्षेत्र.

## अनुसूची "ब"

### संक्रमणात्मक क्षेत्रातील स्थानिक क्षेत्राच्या हद्दीचा तपशील.

| | | |
|---|---|---|
| **पूर्व** | - | मौजे नरखेड व मौजे पासलेवाडी (ता.मोहोळ) या गावची शीव |
| **पश्चिम** | - | मौजे वाफळे व मौजे देवडी (ता. मोहोळ) या गावची शीव |
| **दक्षिण** | - | मौजे चिखली व मौजे यावली (ता. मोहोळ) या गावची शीव |
| **उत्तर** | - | मौजे अंजणगाव (ता. माढा) या गावची शीव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश मोघे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032. dated the 14th September, 2021

*PROCLAMATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN. 2021/C.R.289/UD-18.—In pursuance of the provisions of sub sections (*1*), (*1B*), (*2*) of section 341-A read with sub section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, hereby announces its intention to issue a notification in exercise of the powers conferred by sub-section's (*1*), (*1B*) and (*2*) of section 341- A read with sub-section (*3*) of section 3 of the Act with a view to specify the local combined area of 4 Gram Panchayats *i.e.* Anagar-kombadwadi, Khandobachiwadi, Nalbandwadi and Kuranwadi (Anagar) Gram Panchayats in Solapur District, being an area in transition from Rural area to an urban area, and to constitute collective Nagar Panchayat by the name of the "Anagar Nagar Panchayat" for the said local area, the draft of which is appended herewith.

2. Any person who entertains any objections to the said Proclamation is hereby required to submit the same in writing with the reasons therefore to the Collector, Solapur District within a period of thirty days from the date of publication of this proclamation in the *Maharashtra Government Gazette.*

3. Any such objection which may be received during the said period will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. MUN-2021/C.R.289/UD-18.—Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUN-2021/C.R.289/UD-18, dated the 14th September 2021 published in the *Maharashtra Government Gazette*, dated the 14th September 2021, issued in pursuance of the provisions of sub-sections (*1*), (*1B*), (*2*) of section 341-A read with sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said act"), the Government of Maharashtra had invited objections in the *Maharashtra Government Gazette*, to its proposal to issue a notification under sub-sections (*1*), (*1B*), (*2*) of section 341-A read with sub-section (*3*) of section 3 of the said Act, to specify the local combined area of 4 Gram Panchayats *i.e.* Anagar-kombadwadi, Khandobachiwadi, Nalbandwadi and Kuranwadi (Anagar) Gram Panchayats in Solapur District, being an area in transition from a rural to an urban area and to constitute a collective Nagar Panchayat by the name of the "Anagar Nagar Panchayat" for the said transitional area ;

And whereas, the Government has considered the objections received from Collector, Solapur pursuant to the said Proclamation within the period of 30 days specified therein ;

And whereas, having regard to the factors mentioned in clause (2) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in Schedule "A" appended hereto, to be a transitional area ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341 A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby specifies the said local area to be a transitional area, for which there shall be constituted a Nagar Panchayat, as provided in sub-section (*2*) of said section 341 A of the said Act, by the name Anagar Nagar Panchayat.

The boundaries of the said transitional area shall be such as are specified in Schedule "B" appended hereto.

*Schedule "A"*

**Description of the local area to be specified as a transitional area**

(1) Boundaries of the area of the Village Panchayat of Anagar-Kombadwadi (including Gaonthan) constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959)

(2) Boundaries of the area of the Village Panchayat of Khandobachiwadi (including Gaonthan) constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959)

(3) Boundaries of the area of the Village Panchayat of Nalbandwadi (including Gaonthan) constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959)

(4) Boundaries of the area of the Village Panchayat of Kuranwadi (Anagar) (including Gaonthan) constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959)

*Schedule "B"*

**Boundaries of the local area to be specified as a transitional area**

| | | |
|---|---|---|
| *East* | - | the boundaries of mauza Narkhed and Paslewadi (Tq. Mohol ) |
| *West* | - | the boundaries of mauza Wafale and Dewadi (Tq. Mohol ) |
| *South* | - | the boundaries of mauza Chikhali and Yawali (Tq. Mohol ) |
| *North* | - | the boundaries of mauza Anjangaon (Tq. Madha ) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH MOGHE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.